


दैनिक
# आकर्षण

संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे

दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

वर्ष ५ । अंक १६२ । शुक्रवार १३ मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## रमजान चिंचोलीतील शेतकऱ्याच्या खुनाचा एलसीबीने केला उलगडा

### मुलगा, सून व जावई मुख्य सूत्रधार । आरोपीस शेगावमधून अटक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रमजान चिंचोली (ता. कर्जत) येथील शेतकरी व्यक्तीचा खून करणारा तसेच गुन्हा दाखल करण्याची धमकी देणा–या परभणी येथील प्रेयसीचा खून केल्या प्रकरणी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने आरोपीस शेगाव (जि. बुलढाणा) येथून अटक केली आहे. सुनील रामदास राठोड (वय – ३७, रा. नानासाहेब पातुर, ता. पातुर, जि. अकोला, हल्ली रा. आंबेठाण रोड, चाकण, पुणे) असे आरोपीचे नाव आहे. मिरजगाव येथील व्यक्तीच्या खुनात मृताचा मुलगा, सून व जावई मुख्य सूत्रधार असल्याचे निष्पन्न झाले असून, पोलीस त्यांच्या मागावर आहेत.

मिरजगाव पोलीस ठाण्यात बापू आनंदा गाढवे (वय – ६० वर्षे, रा. चिंचोली रमजान, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) हे बेपत्ता असल्याबाबतची खबर त्यांचा मुलगा आकाश बापू गाढवे (वय २६ वर्षे, धंदा शेती) याने दिली होती. व्यक्तीच्या तपासादरम्यान पोलिसांना खबर देणा–या मुलाविषयी संशय निर्माण झाला. चौकशीत त्याने सुनील रामदास राठोड व त्याच्या नातेवाईकांनी वडिलांचा घातपात केल्याचा संशय व्यक्त केला. त्यानुसार पथकाने सुनील राठोडचा ठावठिकाणा सोधला ■ पान ४ वर

#### शेतजमीन विकू देत नसल्याने मुलगा, सून, जावयाने काढला काटा

**पथकाने सुनील राठोड त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे विचारपूस केली असता त्याने सांगितले की, मृताचा मुलगा आकाश गाढवे, सून पायल ऊर्फ आकांक्षा आकाश गाढवे तसेच प्रथमेश उर्फ भावेश दिगंबर चांदुरकर व अमोल भिकाजी लाटकर (दोघे रा. पुनोती, ता. बार्शीटाकळी, जि. अकोला) यांना मृत बापू आनंदा गाढवे यांची शेतजमीन विकून पैसे घ्यावयाचे होते. परंतु बापू हे शेतजमीन विकू देत नव्हते. त्या कारणावरुन दिनांक ४ जानेवारी २०२६ रोजी दुपारी दोनच्या सुमारास राहत्या घरामध्ये तोंडावर उशी ठेवून तोंड दाबून व गळा आवळून त्यांचा खून केला व घराजवळील लाकडे गोळा करुन डिझेलच्या सहाय्याने प्रेत जाळून टाकले असल्याची कबुली दिली.पोलिसांनी या प्रकरणी मृताचा मुलगा आकाश गाढवे याला ताब्यात घेतले असून, उर्वरित आरोपींचा शोध सुरु आहे.**

#### प्रेयसीला संपविले

**सुनील राठोड याचे शीतल लिंबाजी सोंगेवाड (रा. महातपुरी, ता. गंगाखेड, जि. परभणी) हिच्यासोबत प्रेमसंबंध होते. शीतल ही गुन्हा दाखल करण्याची धमकी देत असल्याने आरोपी सुनीलने दिनांक १६ जानेवारी २०२५ रोजी तिला ठार करून तिचा मृतदेह धनेगांव (ता. बाळापूर, जि. अकोला) परिसरामध्ये अर्धवट जाळून टाकले असल्याची कबुली दिली.**

## वाढीव घरपट्टीचा मुद्दा महासभेत घ्या

### । माजी उपमहापौर गणेश भोसले यांची मागणी । खाजगी एजन्सीमार्फत केलेल्या घरपट्टी रिव्हिजनमुळे नागरिकांमध्ये संभ्रम । संबंधित अधिकारी व एजन्सी प्रतिनिधींना महासभेत उपस्थित ठेवण्याची विनंती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमध्ये चालू आर्थिक वर्षात घरपट्टीचे रिव्हिजन खाजगी एजन्सीमार्फत करण्यात आले असून त्यानुसार मालमत्ताधारकांना वाढीव घरपट्टीच्या नोटिसा देण्यात आल्या आहेत. या वाढीव घरपट्टीबाबत शहरातील नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात तक्रारी येत असल्याने हा विषय आगामी महासभेत चर्चेसाठी घ्यावा, अशी मागणी माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी महापौर ज्योतीताई गाडे यांना पत्राद्वारे केली आहे.

पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, महानगरपालिका हद्दीतील अनेक भागांमध्ये घरपट्टीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याच्या तक्रारी नागरिकांकडून नगरसेवकांकडे येत आहेत. वाढीव घरपट्टीमुळे नागरिकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला असून या संदर्भात नागरिकांना स्पष्ट माहिती मिळत नसल्यामुळे महानगरपालिकेच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर होणाऱ्या महासभेत वाढीव घरपट्टीचा विषय सविस्तर चर्चेसाठी घेण्यात यावा. तसेच घरपट्टी रिव्हिजनशी संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच हे काम ज्या खाजगी एजन्सीमार्फत करण्यात आले आहे, त्या एजन्सीचा पूर्ण माहिती असलेला प्रतिनिधी महासभेत उपस्थित राहील याबाबत संबंधित विभागाला आदेश देण्यात यावेत, अशी विनंतीही त्यांनी पत्रातून केली आहे.

नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेता या विषयावर महासभेत सविस्तर चर्चा होऊन योग्य निर्णय घेतला जावा, अशी अपेक्षा शहरातील नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## टाकळी ढोकेश्वर येथे स्वतंत्र पोलीस ठाण्याला अंतिम मंजुरी

### आमदार काशिनाथ दाते यांच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने टाकळी ढोकेश्वर येथे स्वतंत्र पोलीस ठाण्याला मंजुरी दिली आहे. पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निर्णय राजपत्राद्वारे जाहीर झाला आहे.

या नव्या पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात टाकळी ढोकेश्वर, सावरगाव, ढोकी, नांदुर पठार, कर्जुले हर्या, काटाळवेढा, वनकुटे, पळसपुर, मांडवे खुर्द, कासारे, खडकवाडी, म्हसोबाझाप, देसवडे, वारणवाडी, वासुंदे, गारगुंडी, वडगाव सावताळ, ढवळपुरी, पळशी, काकणेवाडी, पोखरी, हिवरे कोरडा, पिंपळगाव रोठा, माळकुप, अक्कलवाडी, काळकुप, तिखोल, भनगडेवाडी, कारेगाव, डोंगरवाडी, धोत्रे खुर्द, भोंद्रे, धोत्रे बु., तास, गाजदीपूर अशी ३५ गावे समाविष्ट करण्यात आली आहेत.



तसेच या निर्णयामुळे पारनेर पोलीस ठाण्यावरील ताण कमी होऊन पारनेर, विरोली, पुणेवाडी, हातलखिंडी, सिद्धेश्वरवाडी, बहिरोबावाडी, पानोली, कान्हुरपठार, वडुले, पिंपळगाव तुर्क, राळेगणसिद्धी, पिंपळनेर, वडगाव दर्या, भांडगाव, वेसदरे, वडगाव आमली, पिंप्री पठार, दैठणे गंजाळ, शेरी कोलदरा, सारोळा आडवाई, निघोज, किन्ही, जामगाव, गांजीभोयरे, लोणी हवेली, ■ पान ४ वर

### महापौर दुर्धर वैद्यकीय सहायता निधीचे धनादेश वाटप

## सर्वसामान्यांना उपचारासाठी मोठा आधार – महापौर ज्योतीताई गाडे

### नागरिकांनी महापौर वैद्यकीय सहायता निधीचा लाभ घ्यावा – दिपालीताई बारस्कर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या वतीने महापौर दुर्धर वैद्यकीय सहायता निधी अंतर्गत गरजू नागरिकांना धनादेशांचे वाटप महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, सध्या समाजामध्ये विविध प्रकारचे आजार मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहेत. सर्वसामान्य कुटुंबातील अनेक व्यक्ती आर्थिक परिस्थितीमुळे आजारपणाकडे दुर्लक्ष करत असतात.



त्यामुळे त्या आजाराचे वेळेवर निदान होत नाही आणि पुढे गंभीर आजारांना सामोरे जावे लागते. ही बाब लक्षात घेऊन महापालिकेच्या माध्यमातून महापौर दुर्धर वैद्यकीय सहायता निधी सुरू करण्यात आला आहे. या निधीच्या माध्यमातून गरजू नागरिकांना आपल्या आजारपणाचे वेळेत निदान करून घेता येते तसेच योग्य वेळी डॉक्टरांकडून उपचार घेण्यास मदत मिळते. यामुळे संबंधित व्यक्तीचे आरोग्य निरोगी आणि सुदृढ राहण्यास मोठा हातभार लागतो, असे त्यांनी सांगितले.
■ पान ४ वर

## उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी महानगरपालिकेच्या जुन्या मनपा कार्यालयातील विविध विभागाची केली पाहणी





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महानगरपालिकेच्या जुने मनपा कार्यालयास उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी भेट देत तेथील विविध विभागांच्या कामकाजाची पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांनी कार्यालयातील प्रशासकीय कामकाज, नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांची माहिती तसेच विभागनिहाय कामकाजाचा आढावा घेतला.

उपमहापौर जाधव यांनी संबंधित विभाग प्रमुख व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून कार्यालयीन कामकाजात येणाऱ्या अडचणी, आवश्यक सुविधा तसेच नागरिकांना सेवा देताना भेडसावणाऱ्या समस्या यांची माहिती जाणून घेतली. कर्मचाऱ्यांनीही काही अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. त्या सोडविण्यासाठी आवश्यक त्या स्तरावर पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी कार्यालय परिसरातील स्वच्छतेचा आढावा घेत असताना काही ठिकाणी अस्वच्छता आढळून आल्याने त्यांनी संबंधित महापालिका अधिकाऱ्यांना तात्काळ स्वच्छता करण्याच्या तसेच परिसर कायमस्वरूपी स्वच्छ ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याच्या सूचना दिल्या. नागरिक मोठ्या संख्येने या कार्यालयात येत असल्यामुळे परिसर स्वच्छ व सुस्थितीत ठेवणे अत्यंत गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

तसेच यावेळी उपमहापौर जाधव यांनी जुने मनपा सभागृहाचीही पाहणी केली. काही वर्षांपूर्वी लागलेल्या आगीत हे ऐतिहासिक सभागृह जळून खाक झाले असून सध्या त्याची अवस्था पाहून त्यांनी खंत व्यक्त केली. या ठिकाणी उभे राहून त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी आठवणी सांगताना उपमहापौर जाधव म्हणाले की, ''लहानपणी मी माझे वडील स्व. कृष्णाभाऊ जाधव यांच्यासोबत या सभागृहात आलो होतो. त्यावेळी या सभागृहात अरुणकाका जगताप, शंकरराव घुले, अभयतात्या आगरकर हे नगराध्यक्ष म्हणून कार्यरत होते, तर माझे वडील स्व. कृष्णाभाऊ जाधव हे उपनगराध्यक्ष होते. त्या काळात या सभागृहात अनेक मान्यवरांची तेलचित्रे लावलेली होती. आज त्या ठिकाणाची झालेली दुरवस्था पाहून मनाला वेदना होतात.'' या ऐतिहासिक सभागृहाचे जतन ■ पान ४ वर

## खंडोबा यात्रेपूर्वी नगर–मनमाड रस्त्याला वेग द्या; डॉ. सुजय विखे पाटील यांचा ठेकेदाराला सुचना

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राहुरी शहराचे ग्रामदैवत असलेल्या खंडोबा महाराज यात्रेच्या पार्श्वभूमीवर नगरमनमाड राज्य महामार्गाचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करण्यासाठी भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी आज शुक्रवारी भल्या सकाळी राहुरीत हजेरी लावत ठेकेदाराला पुन्हा कडक सूचना दिल्या.

सकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास त्यांनी प्रत्यक्ष रस्त्याची पाहणी करत कामाचा आढावा घेतला आहे. राहुरी शहरात दरवर्षी होणाऱ्या खंडोबा यात्रेसाठी मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असते. यात्रेच्या पार्श्वभूमीवर शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी, यासाठी नगरमनमाड राज्य महामार्गाचे अपूर्ण काम तातडीने पूर्ण करणे आवश्यक असल्याचे विखे पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले.

दरम्यान त्यांनी शहराचे ग्रामदैवत खंडोबा महाराजांचे दर्शन घेतल्यानंतर थेट रस्त्यावर येऊन ठेकेदाराला कामाची गती वाढवण्याच्या सूचना दिल्या. यात्रेदरम्यान भाविकांची मोठी गर्दी होणार असल्याने अपूर्ण रस्त्यामुळे नागरिक आणि भाविकांना अडचणी निर्माण होऊ नयेत, यासाठी यात्रेपूर्वीच काम पूर्ण करून वाहतूक सुरळीत करण्याचे निर्देश त्यांनी दिले. नगरमनमाड राज्य महामार्गाचा निधी आणि कामकाज अनेक वर्षांपासून वादाच्या भोवऱ्यात अडकले होते. मात्र आता या रस्त्याच्या कामाकडे पुन्हा लक्ष देत ते लवकर पूर्ण व्हावे, यासाठी विखे पाटील यांनी पुढाकार घेतला आहे. यावेळी दादा पाटील सोनवणे, नगरसेवक अरुण साळवे, राजेंद्र उंडे, अमोल काशीद, नंदकुमार डोळस, सचिन मेहत्रे, अजित डावखर, नरेंद्र शेटे, सुजय काळे, युवराज गाडे, दिनेश उंडे, संतोष बर्डे, जितू बर्डे, शांताराम शेटे, सुरेश भुजाडी, कारभारी डौले, सचिन भोंगळ, राजेंद्र वराळे, ठेकेदार महेश गायकवाड, संपर्क अधिकारी मनोज गव्हाणे आदी उपस्थित होते.

**नगरमनमाड रस्त्याच्या कामाला गती; डॉ. विखे पाटील यांच्या पुढाकाराचे कौतुक**

नगरमनमाड राज्य महामार्गाच्या कामासाठी डॉ.सुजय पाटील यांनी घेतलेली पुढाकाराची भूमिका अत्यंत कौतुकास्पद असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. अनेक अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या बहुचर्चित रस्त्याचा प्रश्न त्यांनी गंभीरतेने घेत प्रशासनाचे लक्ष वेधले आणि कामाला गती मिळवून दिली. रस्त्याच्या कामाला सुरुवात झाल्यानंतर वाहतूक कोंडीची समस्या तसेच अपघातांचे प्रमाण कमी झाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. लोकांच्या जीविताशी संबंधित प्रश्नांवर संवेदनशीलतेने काम करणारे नेतृत्व म्हणून डॉ. विखे पाटील यांचे प्रयत्न निश्चितच प्रशंसनीय असल्याचे नागरिकांनी सांगितले.

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगरमध्ये शनिवारी निशुल्क बौद्ध वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन



**अहिल्यानगर - तथागत बुध्दिस्ट सोसायटी इंडियाच्या वतीने शहरात निशुल्क बौद्ध वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील युवक-युवतींना योग्य जोडीदार मिळावा आणि विवाह प्रक्रियेला सुलभता यावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या मेळाव्यात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय कांबळे व वधू-वर समिती प्रमुख अशोक बागुल यांनी केले आहे. हा वधू-वर परिचय मेळावा शनिवार, दि. १४ मार्च रोजी न्यू टिळक रोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे आयोजित करण्यात आला आहे. सकाळी उद्घाटन सत्रानंतर वधू-वर परिचय मेळाव्याला प्रारंभ होणार असून त्यामध्ये सहभागी युवक-युवतींना एकमेकांची ओळख करून देण्यात येणार आहे.या मेळाव्यात बौद्ध समाजातील अविवाहित युवक-युवतींसह घटस्फोटीत तसेच विधुर व्यक्तींचीही नोंदणी केली जाणार आहे. विवाहासाठी इच्छुक असलेल्या कुटुंबांना एकाच ठिकाणी एकमेकांची माहिती मिळावी आणि संवाद साधता यावा, यासाठी हा मेळावा उपयुक्त ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.सहभागी होणाऱ्या युवक-युवतींच्या पालकांनी आपल्या मुला-मुलींचा बायोडाटा व फोटो सोबत घेऊन उपस्थित राहावे, असेही आवाहन आयोजकांनी केले आहे. तसेच मेळाव्याबाबत अधिक माहिती किंवा नोंदणीसाठी संजय कांबळे (मो. ९९७०७७५५२२) व अशोक बागुल (मो. ९८८१८२७८९२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

### मुकुंदनगर येथे इज्तेमाई खत्नाचे आयोजन

**अहिल्यानगर- नुसरा एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटीच्या वतीने ५ एप्रिल रोजी मुकुंदनगर, गोविंदपुरा येथील जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात इज्तेमाई खत्ना चे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात नाममात्र शुल्कात खत्ना करुन मोफत औषधे दिली जाणार आहे. याचा लाभ घेण्यासाठी नावनोंदणी करण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. ५ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजल्यापासून या उपक्रमास प्रारंभ होणार आहे. मालेगाव येथील खलिफा डॉ. वसीम शेख मुलांची खत्ना करणार आहे. नाव नोंदणीसाठी समीर कुशन हेडकॉटर गेट व्हिन्सेनपुरा व राज जनरेटर्स हातमपुरा येथे नोंदणी करण्याचे सांगण्यात आले आहे.**
**ही नाव नोफ्लदणी ३ एप्रिल पर्यंत करता येणार आहे. प्रथम नोफ्लदणी करणाऱ्यास प्राधान्य दिले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. शिबिर यशस्वी करण्यासाठी इलियास जहागीरदार, डॉ. जुबेर शेख, अन्सार शेख, नदीम शेख. अबुजर शेख, शफीक शेख, अतहर सय्यद, रिजवान सय्यद, शब्बीर सय्यद आदी परिश्रम घेत आहे. अधिक माहितीसाठी जावेद खान ९२७३२५५२४२, नासिर सर ८०८०९७९७३०, ईलियास शेख ९८९०७८६५६० व शब्बीर सय्यद ९५६१३५४७७७ यांच्याशी संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.**

## वंदे मातरम मातृभूमी प्रेमाचे प्रतीक - प्राचार्य डॉ. मतकर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वंदे मातरम चलचित्र रथाचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, ''वंदे मातरम हे मातृभूमीवरील प्रेम तसेच देशभक्तीचे प्रतीक आहे. स्वातंत्र्य आंदोलनात या गीताने सामान्य भारतीयांमध्ये जाज्वल्य देशभक्तीची ज्योत पेटविण्याचे कार्य केले. अनेक स्वातंत्र्यसैनिक या गीताने प्रेरित होऊन देशकार्य करत होते.''

वंदे मातरम गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने विविध महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना या गीताचे तसेच स्वातंत्र्य आंदोलनाचे महत्त्व समजावे यासाठी चलचित्र रथ फिरविण्यात येत आहे. हा विद्यापीठाचा अत्यंत स्तुत्य उपक्रम असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जिजाभाऊ घुले यांनी केले. प्रास्ताविक प्रा. लक्ष्मण कोठावळे यांनी केले, तर आभार प्रा. नामदेव वाल्हेकर यांनी मानले. वंदे मातरम गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.ब या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विरेंद्र धनशेट्टी, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, कार्यालयीन प्रमुख श्री. सावकार काकडे, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिला दिनानिमित्त सावेडीत वृक्षारोपण; पर्यावरण संवर्धनाचा संदेश

### महिलांनी पुढे येऊन पर्यावरण संवर्धनासाठी योगदान द्यावे - साधना कुकडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जागतिक महिला दिनानिमित्त सावेडी येथील पंचवटी परिसरातील श्रीराम मंदिरात महिलांच्या सहभागातून वृक्षारोपणाचा उपक्रम पार पडला. महिलांच्या हस्ते जास्वंदाच्या रोपांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. सामाजिक कार्यकर्त्या व उपक्रमशील शिक्षिका साधना कुकडे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात नगरसेविका दिपालीताई बारस्कर यांच्या हस्ते जास्वंदाच्या रोपांची लागवड करण्यात आली. उपस्थित महिलांनीही उत्साहाने वृक्षारोपण करून परिसर हिरवागार ठेवण्याचा संकल्प केला. पर्यावरण रक्षणासोबतच समाजात महिलांची भूमिका अधिक मजबूत करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

यावेळी बोलताना नगरसेविका दिपालीताई बारस्कर म्हणाल्या की, आजच्या धकाधकीच्या जीवनात पर्यावरणाचा समतोल राखणे अत्यंत गरजेचे आहे. वृक्षारोपण हा केवळ एक कार्यक्रम नसून भविष्यातील पिढ्यांसाठी दिलेली अमूल्य भेट आहे. प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली तर शहरातील पर्यावरण



अधिक निरोगी व समृद्ध होईल. स्वच्छ, सुरक्षित आणि निरोगी वातावरणात जगणे हा प्रत्येक माणसाचा मूलभूत हक्क आहे आणि तो टिकवण्यासाठी समाजाने एकत्रितपणे पुढाकार घेणे आवश्यक आहे.

सामाजिक कार्यकर्त्या साधना कुकडे यांनी महिला दिनाच्या महत्वाबद्दल सांगताना सांगितले की, महिला दिन हा केवळ उत्सवाचा दिवस नसून समाजाला संवेदनशील करण्याचा आणि स्त्री–पुरुष समानतेचा संदेश देण्याचा दिवस आहे. प्रत्येक महिलेला सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार आहे. महिलांच्या सहभागातून समाजात सकारात्मक बदल घडू शकतो. पर्यावरण संवर्धनासारख्या उपक्रमांमध्ये महिलांनी पुढाकार घेतल्यास समाजात जागरूकता अधिक प्रभावीपणे निर्माण होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

वृक्षारोपणाचे महत्त्व स्पष्ट करताना त्या म्हणाल्या की, झाडे ही पृथ्वीची खरी संपत्ती आहेत. वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि घटणारी हरितसंपदा या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने वृक्ष लागवड व संवर्धनाला प्राधान्य दिले पाहिजे. महिलांनी पुढे येऊन पर्यावरणाच्या जतनासाठी काम केले तर समाजात निसर्गाबद्दलची जाणीव अधिक दृढ होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## शिक्षणामुळेच स्त्री सशक्त होते - अरुणाताई पारधे

**। महिला सशक्तीकरणाचा संदेश देत जागतिक महिला दिन साजरा**
**। आयडियल हेल्पिंग हॅण्ड फाउंडेशनचा उपक्रम; स्वावलंबी महिलांचा सन्मान**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आयडियल हेल्पिंग हॅण्ड फाउंडेशन या सामाजिक संस्थेमार्फत जागतिक महिला दिनानिमित्त महिला सशक्तीकरणाचा संदेश देणारा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. समाजातील महिलांना प्रोत्साहन देणे, स्वावलंबनाची जाणीव निर्माण करणे तसेच सामाजिक बांधिलकी दृढ करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आरोग्य विभागातील अरुणाताई पारधे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता वसंतराव पारधी, पोलीस उपनिरीक्षक मन्सूर सय्यद, बांधकाम विभागातील अभियंता पुनम प्रकाश थोरात तसेच महाराष्ट्र शासनाच्या कुष्ठरोग कार्यालयातील अवैद्यकीय सहाय्यक सुनील पवार उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचे स्वागत करून महिला सशक्तीकरणाच्या कार्यात योगदान देणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महिला शिक्षण, स्वावलंबन आणि सामाजिक सहभाग यांचे महत्त्व अधोरेखित केले.

अध्यक्षीय भाषणात अरुणाताई पारधे यांनी महिलांच्या जीवनात शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. त्या म्हणाल्या की, स्त्री शिक्षण हा केवळ अधिकार नसून समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक घटक आहे. त्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतीराव फुले यांच्या कार्याचा उल्लेख करत स्त्रियांसाठी शिक्षणाचा मार्ग खुला करण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची आठवण करून दिली.

स्त्री शिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढतो, समानतेची जाणीव निर्माण होते आणि समाजात सन्मानाने जगण्याची ताकद मिळते. त्यामुळे प्रत्येक मुलीला शिक्षणाची संधी मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

पीपल्स हेल्पलाईनचे प्रकाश थोरात यांनी आपल्या भाषणात महात्मा ज्योतीराव फुले यांच्या कार्याचा संदर्भ दिला. त्यांनी सांगितले की, ज्योतीराव फुले यांनी अहमदनगर येथे मिशनरी शिक्षिका मिस फरार यांच्या मुलींच्या शाळेला भेट दिली होती. त्या शाळेतील शिक्षणपद्धती पाहून ते प्रभावित झाले आणि त्यातूनच पुण्यात मुलींसाठी शाळा सुरू करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. यानंतर त्यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले आणि त्यांच्याच माध्यमातून मुलींच्या शिक्षणाची चळवळ सुरू झाली. या ऐतिहासिक कार्यामुळे भारतीय समाजात स्त्री शिक्षणाला नवी दिशा मिळाली, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान आयडियल हेल्पिंग हॅण्ड फाउंडेशनच्या संस्थापक सदस्य कुंदबाला मोहन गायकवाड यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. तसेच डॉ. मनीषा लक्ष्मण यांनी महिलांना प्रेरणादायी मार्गदर्शन करत आरोग्य, स्वावलंबन आणि जागरूकतेविषयी महत्त्वपूर्ण विचार मांडले. यावेळी संस्थेमार्फत स्वावलंबी बनविण्यात आलेल्या मुलींचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच झोपडपट्टी परिसरात कार्यरत स्नेहालय संचालित बालभवन येथील समाजसेविका महिलांचाही गौरव करण्यात आला. कार्यक्रमानिमित्त उपस्थित सर्व महिलांना भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

## आयएएस झालेल्या ऋतुजा गायकवाड यांच्या हस्ते श्री विशाल गणेश मंदिरात आरती देवस्थानच्या वतीने सन्मान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय प्रशासकीय सेवेत निवड झालेल्या कु. ऋतुजा अशोक गायकवाड यांच्या हस्ते शहरातील श्री विशाल गणेश मंदिरात विशेष आरती संपन्न झाली. त्यांच्या यशाबद्दल भाविक व परिसरातील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करत उत्स्फूर्त स्वागत केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कु. ऋतुजा गायकवाड यांनी श्री विशाल गणेशाचे दर्शन घेऊन विधिवत आरती केली. त्यांच्या या यशाबद्दल मंदिर विश्वस्त व उपस्थित नागरिकांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. आरतीनंतर उपस्थितांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत समाजासाठी कार्य करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी मंदिराचे महंत संगमनाथ महाराज ,उपाध्यक्ष पंडित खरपुडे ,सचिव अशोकराव कानडे ,विश्वस्त पांडुरंग नन्नवरे ,प्रा माणिकराव विधाते आदींसह ऋतुजा गायकवाड यांचा परिवार उपस्थित होता.

सचिव अशोकराव कानडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''ग्रामीण भागातून येऊन कठोर परिश्रमाच्या जोरावर आयएएससारखी प्रतिष्ठेची परीक्षा उत्तीर्ण होणे ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. ऋतुजा गायकवाड यांचे यश हे केवळ त्यांच्या कुटुंबासाठीच नव्हे तर संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. तरुणांनी त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन शिक्षणाच्या माध्यमातून मोठी स्वप्ने पूर्ण करावीत.''

यावेळी विश्वस्त माणिकराव विधाते यांनीही आपल्या मनोगतात सांगितले की, ''आजच्या स्पर्धेच्या युगात चिकाटी, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यास यामुळेच यश मिळते. ऋतुजा गायकवाड यांनी कठोर परिश्रमातून हे यश संपादन करून समाजातील विद्यार्थ्यांसाठी आदर्श निर्माण केला आहे. अशा विद्यार्थ्यांमुळे समाजाचा आणि देशाचा विकास अधिक वेगाने होऊ शकतो.''

यावेळी कु. ऋतुजा गायकवाड यांनीही उपस्थितांशी संवाद साधताना सांगितले की, ''माझ्या यशामागे आई–वडिलांचे मार्गदर्शन, शिक्षकांचे संस्कार आणि समाजाचा आशीर्वाद आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करून सातत्याने प्रयत्न केले तर कोणतीही परीक्षा कठीण राहत नाही. पुढील काळात प्रशासनात काम करताना समाजाच्या विकासासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर काम करण्याचा माझा प्रयत्न राहील.''

या प्रसंगी त्यांचे वडील प्राथमिक शिक्षक अशोक गायकवाड, चुलते उत्तमराव गायकवाड, आकाश गायकवाड, बाजीराव गायकवाड, किशोर जेजुरकर, महेश भणभने ,गणेश राऊत यांच्यासह अनेक भाविक उपस्थित होते.

## करार रद्द करून संत एकनाथ साखर कारखान्यावर प्रशासक नेमावा - आमदार भुमरे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** संत एकनाथ सहकारी साखर कारखाना आणि सचिन घायाळ शुगर मिल यांच्यात झालेल्या सहभाग करारात नियम व अटींचे उल्लंघन झाल्याचा आरोप करत हा करार तात्काळ रद्द करून कारखान्यावर प्रशासक नियुक्त करावा, अशी मागणी आमदार विलास भुमरे यांनी राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी सूचनेद्वारे केली.

आ. भुमरे म्हणाले की, संत एकनाथ सहकारी साखर कारखाना आणि सचिन घायाळ शुगर मिल यांच्यात १८ वर्षांच्या कालावधीसाठी सहभाग करार करण्यात आला होता. मात्र या करारातील अनेक अटींचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

करारानुसार संत एकनाथ साखर कारखान्यावर असलेले सुमारे ५७ कोटी रुपयांचे कर्ज ११ वर्षांच्या कालावधीत फेडण्याची जबाबदारी सचिन घायाळ शुगर मिलवर होती. मात्र कर्ज फेडण्याऐवजी कारखान्यावर कर्जाचा बोजा वाढल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच कारखान्याची मालमत्ता शासनाची असतानाही ती गहाण ठेवून बुलडाणा बँकेतून सुमारे ३० कोटी रुपयांचे कर्ज उचलण्यात आले. या रकमेपैकी सुमारे १६ कोटी १७ लाख रुपये अफरातफर केल्याचाही आरोप करण्यात आला.

दरम्यान, यावर उत्तर देताना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले की, सचिन शुगर मिल संदर्भात सहकार विभागाकडे विविध तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने शासनाने लेखापरीक्षण केले असता काही गैरप्रकार आढळून आले आहेत. त्यामुळे संबंधित भागधारकांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून कारखान्याच्या सीएवरही कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

## डॉ.विखे पाटील अभियांत्रिकीत स्टार्टअप टॉक सिरीजमध्ये धुमाळ यांचे व्याख्यान





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात स्टार्टअप टॉक सिरीजने उद्योजकीय उत्साह प्रज्वलित केला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्टार्टअप व इनोव्हेशन सेल यांच्या संयुक्त विद्यमाने अभियांत्रिकीच्या विद्यार्थी तसेच शिक्षक वर्गासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्टार्टअप टॉक सिरीज आयोजीत करण्यात आली होती.

या वेळी श्री.एन.बी. धुमाळ एक प्रसिध्द उद्योजक तसेच प्रेरणादायी वक्ते आणि 'यशस्वीतेचा सुवर्णमंत्र' या बेस्टसेलर पुस्तकाचे लेखक यांनी यशस्वितेच्या व्यावहारीक रणनीती सांगितल्या. एन.बी. धुमाळ चॅरीटेबल फौंडेशनच्या अनुभवावरुन त्यांनी उपस्थितांना युवा सशक्तीकरण आणि मनोवृत्ती परिवर्तनाच्या ख–या कथा सांगितल्या. अभियांत्रिकी केवळ नोक–यांबाबत नाही, ती समाजावर प्रभाव टाकणा–या उपाययोजना तयार करण्याबाबत आहे असे ते म्हणाले. नोकरी करणारे नाही तर नोकरी देणारे बना असे त्यांनी अनुभवातून विशद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ.अजित लावरे हे उपस्थित होते. कार्यकमाचे सूत्रसंचालन प्रा.दत्तात्रय नन्नवरे यांनी केले.

संस्थेचे प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर यांनी या सारख्या महत्वाच्या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केल्याबद्दल विभागप्रमुखांचे कौतुक केले. या उपक्रमासाठी डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे डायरेक्टर टेक्निकल प्रा.श्री. सुनिल कल्हापुरे यांचे मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमासाठी डायरेक्टर जनरल डॉ.पी.एम.गायकवाड मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खा.डॉ.सुजय विखे पाटील,नामदार डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.


**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### भिमसैनिक नितीन शिरसाठ हत्येतील फरार आरोपींना अटक करून मोक्का अंतर्गत कारवाईची मागणी



अहिल्यानगर  घोडेगाव येथील भिमसैनिक नितीन विलास शिरसाठ यांच्या हत्येप्रकरणातील फरार आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करावी, अशी मागणी समस्त स्वाभिमानी आंबेडकरी चळवळीच्या वतीने पोलीस अधीक्षकांना निवेदन देऊन करण्यात आली. दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५.३० वाजण्याच्या सुमारास घोडेगाव येथील घोडेश्वरी हॉस्पिटल येथे भिमसैनिक नितीन शिरसाठ यांची अज्ञातांनी गोळ्या झाडून निर्घृण हत्या केली होती. या वेळी परिसरात अनेक नागरिक उपस्थित असताना आरोपींनी कोणतीही पर्वा न करता गोळीबार करत दहशत निर्माण केली. घोडेगाव बाजाराच्या पावतीच्या टेंडरच्या वादातून ही घटना घडल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.निवेदनात पुढे म्हटले आहे की, या प्रकरणातील फुलमाळी टोळीची तालुक्यात मोठी दहशत असून, जमीन बळकावणे, अवैध धंदे करणे, सार्वजनिक ठिकाणी अग्निशस्त्र बाळगणे अशा गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये त्यांचा सहभाग असल्याचे सांगण्यात आले आहे. संबंधित आरोपींवर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल असूनही ते अद्याप फरार असल्याने फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांच्या जिविताला धोका निर्माण झाला आहे.

### फॅशन विश्वात अहिल्यानगरच्या विनल गुंदेचा यांची मोठी झेप



अहिल्यानगर-  फॅशन क्षेत्रात अभिमानास्पद कामगिरी करत नगरच्या फॅशन डिझायनर विनल मनोज गुंदेचा यांच्या डिझाईन्सची निवड प्रतिष्ठित लॅक्मे फॅशन वीक जेननेक्स्ट मार्च २०२६ साठी झाली आहे. त्यांना या फॅशन वीकमध्ये विजेतेपदही मिळाले आहे. दि. २० मार्च रोजी मुंबई येथे आयोजित लॅक्मे फॅशन वीकच्या रॅम्पवर गुंदेचा  आपला पहिले कलेक्शन '' अ पोस्टकार्ड फ्रॉम व्हॅली ऑफ फ्लॉवर्स सादर करणार आहेत. पेपरपासून थ्रेड पर्यंत डिझाईन त्यांनी केले. जुबिनव चड्ढा या लेबलसाठी  तयार केलेल्या त्यांच्या डिझाईन्सना परीक्षकांकडून विशेष दाद मिळाली असून प्रसिद्ध फॅशन डिझायनर मनीष मल्होत्रा  यांच्या समोर त्यांची निवड होणे हे त्यांच्या कारकिर्दीतील मोठे यश मानले जात आहे. गुंदेचा यांनी इंडियन ॲकॅडमी ऑफ फॅशन डिझायनिंग येथे रचना काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली डिप्लोमा पूर्ण केला असून स्कूल ऑफ फॅशन डिझायनिंग पुणे येथून डिग्री मिळवली आहे. सर्व शिक्षक, स्टाफचे त्यांना मार्गदर्शन मिळाले आहे. विनल गुंदेचा या सहकारमहर्षी स्व. सुवालालजी गुंदेचा यांची नात तर जैन ओसवाल पतसंस्थेचे संचालक मनोज गुंदेचा यांची मुलगी आहे.  या यशामुळे गुंदेचा कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण असून विनल यांच्या या यशाबद्दल विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### महारवतनाच्या शेतजमिनीवर बेकायदा कब्जाचा विधवा महिलेचा आरोप

अहिल्यानगर- महारवतनाच्या ढोरजे (ता. श्रीगोंदा) येथील शेतजमिनीवर बेकायदेशीररित्या कब्जा करून धमक्या देणे व शेतात येण्यास मज्जाव केल्याचा आरोप करत वत्सला भोईटे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदन दिले आहे. संबंधितांवर तात्काळ कारवाई करावी, अन्यथा १६ मार्च २०२६ पासून श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. निवेदनात म्हटले आहे की, त्या ढोरजे (ता. श्रीगोंदा) येथील रहिवासी असून अनुसूचित जाती प्रवर्गातील आहेत. मौजे ढोरजे येथील गट क्रमांक २४६ मध्ये त्यांच्या वडीलोपार्जित महारवतनाची शेतजमीन आहे. या जमिनीबाबत खरेदीखत रद्द करण्यासाठी न्यायालयात दावा दाखल असून तो सध्या न्यायालयात प्रलंबित आहे. सदर जमिनीची मालकी पूर्वीपासून त्यांच्या कुटुंबाकडे असून पतीच्या निधनानंतर त्या स्वतः ही जमीन कसत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

## आयपीएस झाल्याबद्दल निखिल तांबे यांचा एस.टी. को-ऑप बँकेकडून सन्मान

### जामखेड आगारातील हेल्पर काशिबा तांबे यांचा मुलगा ठरला प्रेरणादायी उदाहरण



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवून आयपीएस अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल निखिल काशिबा तांबे यांचा एस.टी. को-ऑप बँक, अहिल्यानगर शाखेच्या वतीने सन्मान करण्यात आला. जामखेड आगारातील एसटी महामंडळात हेल्पर म्हणून कार्यरत असलेल्या काशिबा तांबे यांच्या मुलाने कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर मिळवलेल्या या यशाबद्दल उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले.

नुकत्याच जाहीर झालेल्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या निकालात निखिल तांबे यांनी ५१७ वी रँक मिळवून आयपीएस पदासाठी निवड मिळवली आहे. साध्या कुटुंबातील मुलाने देशातील अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षेत यश संपादन केल्याने समाजातील युवकांसाठी ते प्रेरणादायी ठरले आहेत.

या पार्श्वभूमीवर एसटी को-ऑप बँक अहिल्यानगर शाखेच्या वतीने त्यांचा सत्कार करून त्यांच्या यशाचा गौरव करण्यात आला. यावेळी बँकेचे संचालक दत्तात्रय खेडकर, शाखा व्यवस्थापक प्रशांत घोडके तसेच शाखाधिकारी वृंदा कंगले आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते निखिल तांबे यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी बोलताना बँकेचे संचालक दत्तात्रय खेडकर म्हणाले की, ''निखिल तांबे यांचे यश हे केवळ त्यांच्या कुटुंबाचेच नव्हे तर संपूर्ण समाजाचे अभिमानाचे आहे. अत्यंत साध्या परिस्थितीतून पुढे येत त्यांनी देशातील सर्वोच्च सेवांपैकी एका सेवेत स्थान मिळवले आहे. त्यांची जिद्द, मेहनत आणि चिकाटी ही आजच्या तरुणांसाठी आदर्श ठरणारी आहे. योग्य ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्न केल्यास कोणतीही गोष्ट अशक्य नाही, हे निखिलने आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. अशा गुणवंत युवकांचा सन्मान करणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे.''

शाखाधिकारी वृंदा कंगले यांनी देखील यावेळी भाषणात तांबे यांच्या यशाचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी तांबे यांचे अभिनंदन करुन त्यांच्या यशाचा गौरव केला.

## आनंदऋषी हॉस्पिटलचे सेवाभावी उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी – महावीर बडजाते

### आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये त्वचारोग तपासणी शिबिर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जैन सोशल फेडरेशनद्वारे संचालित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे रुग्णांच्या आरोग्यसेवेसाठी त्वचारोग तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन महावीर फूड प्रोडक्ट्सचे संचालक उद्योजक महावीर बडजाते व अशोक चुडीवाल यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास समाजातील अनेक मान्यवर तसेच डॉक्टर व नागरिकांची उपस्थिती लाभली.

यावेळी कुणाल बडजाते, अजय गंगवाल, डॉ. विजया एरंडे, संतोष बोथरा, मानकशेठ कटारिया, सतीश लोढा, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष बोथरा यांनी , तर सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार सतीश लोढा यांनी मानले.

उद्घाटन प्रसंगी बोलताना उद्योजक महावीर बडजाते म्हणाले की, श्री आनंद ऋषीजी हॉस्पिटलने समाजासाठी राबविलेले उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहेत. आरोग्यसेवा ही समाजासाठी अत्यंत महत्त्वाची बाब असून अशा शिबिरांमुळे अनेक गरजू रुग्णांना योग्य उपचार आणि मार्गदर्शन मिळते. समाजातील दुर्बल व गरजू घटकांसाठी या प्रकारच्या उपक्रमांची गरज आज अधिक जाणवत आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, आनंद ऋषी हॉस्पिटल हे अनेक रुग्णांसाठी हक्काचे आणि विश्वासाचे ठिकाण बनले आहे. येथे येणाऱ्या रुग्णांना कोणताही संकोच न बाळगता आपले आजार तपासून घेता येतात आणि योग्य उपचार मिळतात. त्यामुळे या रुग्णालयामुळे समाजातील अनेक गरजू रुग्णांना मोठा आधार मिळत असून अशा सेवाभावी कार्यामुळे संस्थेचे कार्य अधिक बळकट होत आहे.

या प्रसंगी डॉ. विजया एरंडे यांनी त्वचारोगाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्वचेचे विविध आजार वेळेवर ओळखणे आणि योग्य उपचार घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. बुरशीजन्य संसर्ग, अलर्जी, खाज, पिंपल्स, सोरायसिस, त्वचेवरील डाग, केस गळणे अशा विविध त्वचारोगांबाबत त्यांनी माहिती देत स्वच्छता, संतुलित आहार आणि योग्य जीवनशैली यांचे महत्त्वही त्यांनी स्पष्ट केले.

त्वचारोगाच्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता योग्य वेळी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. अशा प्रकारच्या तपासणी शिबिरांमुळे अनेक रुग्णांना प्रारंभीच रोगाचे निदान होऊन योग्य उपचार मिळतात, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संतोष बोथरा यांनी बडजाते, चुडीवाल परिवार करीत असलेल्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. हॉस्पिटल रोपे महोत्सवी वर्ष साजरे करीत करीत असून  श्री आनंदऋषी हॉस्पिटलच्या कार्याचा आढावा घेतला. हे रुग्णालय नेहमीच रुग्णांना चांगली व परवडणारी आरोग्यसेवा देण्याचा प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमांमुळे समाजातील अनेक गरजू रुग्णांना मोठा लाभ होत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच आनंदऋषीजींच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या त्वचारोग शिबिरात मोठ्या संख्येने रुग्णांनी तपासणी करून घेतली व तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन घेतले. भविष्यातही अशा आरोग्यविषयक शिबिरांचे आयोजन करून समाजसेवेचे कार्य अधिक व्यापक करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. शिबिरात ४५ रुग्णांची तपासणी करण्यात आली

## विसापूर धरणावरील संशोधनासाठी डॉ. दिलीपकुमार भालसिंग यांना पीएच.डी.



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर कॉलेज, अहिल्यानगर येथील उपप्राचार्य व प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दिलीपकुमार जी. भालसिंग यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याकडून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या संशोधन प्रबंधाचा विषय विसापूर धरण, अहमदनगर येथील जलपरिसंस्थेचा लिम्नोलॉजिकल अभ्यास (झूप्लँक्टन जीवसमूहावर विशेष भर) असा आहे.

हे संशोधन न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त), अहिल्यानगर येथील प्राणिशास्त्र विभागात डॉ. सुनील एन. पोकळे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले. डॉ. भालसिंग यांनी जलस्रोतांमध्ये आढळणाऱ्या सूक्ष्म प्राण्यांच्या समूहावर म्हणजेच झूप्लँक्टन या जीवसमूहावर सखोल संशोधन केले आहे. हे सूक्ष्म जीव जलीय परिसंस्थेत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. ते अन्नसाखळीतील महत्त्वाचा घटक असून माशांसारख्या जीवांचे अन्न बनतात. तसेच हे जीव जैवसूचक म्हणूनही कार्य करतात. पाण्याच्या गुणवत्तेत होणारे बदल त्यांच्या विविधता व संख्येमध्ये दिसून येत असल्याने पर्यावरण व प्रदूषण अभ्यासासाठी त्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

सन २०२२ ते २०२५ या कालावधीत त्यांनी झूप्लँक्टनमधील रोटिफेरा, क्लॅडोसेरा, कोपेपोडा आणि ऑस्ट्राकोडा या चार गटांचा अभ्यास केला. या संशोधनामध्ये पाण्याचा आम्ल–क्षार संतुलन (पीएच), तापमान, विरघळलेल्या घन पदार्थांचे प्रमाण, क्षारता, पाण्याची कठोरता, गढूळपणा, क्लोराईड, एकूण क्षारता तसेच विरघळलेला प्राणवायू या भौतिक व रासायनिक घटकांचा झूप्लँक्टनच्या विविधता व संख्येवर होणारा परिणाम तपासण्यात आला. या अभ्यासात रोटिफेरा गटातील २८, क्लॅडोसेरा गटातील ८, कोपेपोडा गटातील ४ आणि ऑस्ट्राकोडा गटातील २ प्रकार नोंदविण्यात आले असून गोड्या पाण्यातील जलाशयासाठी ही समाधानकारक जैवविविधता असल्याचे निष्कर्षात नमूद करण्यात आले आहे.

सध्याच्या काळात हवामान बदल आणि मानवी हस्तक्षेपामुळे जलीय अधिवासांमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल होत असून अनेक जीवांच्या अस्तित्वावर संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे अशा अधिवासांचा अभ्यास करून त्यातील जीवसृष्टीची मूलभूत माहिती उपलब्ध करून देणे हे भविष्यातील संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याचे या संशोधनातून अधोरेखित झाले आहे.

## कर्तृत्वाचा सन्मान : जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानतर्फे 'शक्ती'चा जागर

### कर्तव्य बजावत असलेल्या ठिकाणी जाऊन विविध क्षेत्रांतील महिलांचा सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून समाजात अहोरात्र कष्ट करणार्या आणि आपल्या कर्तृत्वाने समाजाला दिशा देणार्या महिलांचा गौरव करण्याचा आगळावेगळा उपक्रम जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान महिला मंडळातर्फे राबविण्यात आला. महिला दिन केवळ साजरा करण्यापुरता न ठेवता समाजाच्या प्रत्येक स्तरात योगदान देणार्या महिलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा सन्मान सोहळा पार पडला. विशेष म्हणजे विविध क्षेत्रात आपले कर्तव्य बजावत असलेल्या महिलांच्या कार्यस्थळी जाऊन त्यांचा गुलाब पुष्प व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

या उपक्रमात समाजाचा कणा असलेल्या विविध क्षेत्रांतील महिलांचा गौरव करण्यात आला. ऊन–पावसाची तमा न बाळगता कष्ट करणार्या भाजी विक्रेत्या महिला, नागरिकांच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असणार्या महिला पोलीस प्रशासनातील रणरागिणी, समाजाच्या आरोग्याची काळजी घेणार्या आरोग्य सेविका तसेच न्यायदानासाठी आणि हक्कांसाठी लढणार्या महिला वकील यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या सर्व महिलांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी जाऊन गुलाब पुष्प व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या चेहर्यावरील समाधान आणि आनंद हीच या उपक्रमाची खरी पावती ठरली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानच्या महिला भगिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी सौ. अर्चना गणेश झिंजे, सौ. शितल किशोर विंचुरकर, सौ. सुजाता अभिजीत अष्टेकर, सौ. रामेश्वरी यशवंत कांबळे, सौ. श्वेता प्रदीप दळवी, सौ. वृषाली ललित भूमकर, सौ. कोमल गोरख लिमकर, सौ. शारदा संजय तायडे, सौ. वैशाली सुनील आकडे आणि सौ. पुष्पा विनोद पांढरपोटे या सर्व भगिनींची उपस्थिती लक्षणीय होती. प्रत्येकाने मोठ्या उत्साहाने आणि आत्मीयतेने या सत्कार सोहळ्यात सहभाग घेतला, ज्यामुळे कार्यक्रमाला एक वेगळीच ऊब प्राप्त झाली.

महिला दिन हा केवळ एक दिवसाचे कौतुक नसून स्त्रियांच्या संघर्षाचा आणि यशाचा सन्मान करण्याचा दिवस आहे.

## महिला दिनानिमित्त रविवारी 'नैसर्गिक सौंदर्य व निरोगी जीवन' मार्गदर्शन शिबिर

### गुडघे-सांधे विकार, नॅचरोपॅथी आणि नैसर्गिक सौंदर्य प्रसाधनांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आरोग्यवर्धिनी योग निसर्गोपचार संस्थेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी नैसर्गिक आरोग्य आणि सौंदर्याविषयी मार्गदर्शन करणाऱ्या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. १५ मार्च रोजी शहरात हा कार्यक्रम होणार असून गुडघे व सांधे विकार, नॅचरोपॅथी व शरीर शुद्धी तसेच नैसर्गिक सौंदर्य प्रसाधनांची माहिती अशा विविध विषयांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. दूधगंगा पशुखाद्य केंद्र, शिवाजी महाराज पुतळ्यासमोर, मार्केटयार्ड येथे दुपारी ३ ते ६ या वेळेत हा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमात व्याख्यान, प्रात्यक्षिके तसेच उपस्थित महिलांना पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात येणार आहे. सर्वांसाठी मोफत नॅचरोपॅथी सरबताची व्यवस्था करण्यात आली आहे. या शिबिराचा मोठ्या संख्येने महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन हेमा सेलोत व हेमांगीनी पोतनीस यांनी केले आहे.
कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात पुण्याचे सुप्रसिद्ध तज्ज्ञ डॉ. विश्वजीत चव्हाण गुडघे व सांधे विकारांबाबत मार्गदर्शन करणार आहेत. सूक्ष्म व्यायाम, योगिक व्यायाम आणि योग्य आहार पद्धतीच्या माध्यमातून सांधेदुखी व गुडघेदुखीपासून मुक्ती कशी मिळवता येते, तसेच सांध्यांचे आरोग्य कसे टिकवून ठेवावे याचे प्रात्यक्षिकांसह सविस्तर विश्लेषण ते करणार आहेत.



दुसऱ्या सत्रात डॉ. हेमांगिनी पोतनीस नॅचरोपॅथीच्या माध्यमातून शरीर निरोगी ठेवण्याबाबत मार्गदर्शन करतील. नैसर्गिक पदार्थांचा वापर करून शरीरातील विषारी द्रव्ये कशी बाहेर टाकावी, शरीर शुद्धीची प्रक्रिया कशी करावी याबाबत त्या माहिती देणार आहेत. याचबरोबर 'सहज योग षडचक्र ध्यान' या द्वारे शरीर शुद्धी व रोगमुक्ती याविषयीही मार्गदर्शन केले जाणार आहे.
तिसऱ्या सत्रात नैसर्गिक सौंदर्य प्रसाधनांची प्रात्यक्षिक कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.
घरच्या घरी सहज उपलब्ध असलेल्या नैसर्गिक घटकांपासून २मी.मध्ये मेकअप लिपस्टिक, फेस पॅक आणि लिपबाम कसे तयार करावे याचे प्रात्यक्षिक मार्गदर्शन हेमा सेलोत व ऐश्वर्या शहा (देवी) यांच्या मार्गदर्शनाखाली दिले जाणार आहे.
या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी आधार आपुलकी अकॅडमी फाउंडेशन, बॉलर्स अकॅडमी तसेच योगतज्ज्ञ अनिल मेहर, मनोज राजापुरे, डॉ. पद्माकर रासवे, गणेश तनपुरे, मयूर कांगणे, डॉ. शैलेजा घुले, ज्योती कानडे, शारदा डे, शुक्ला मुथा, दीप्ती गांधी, रिद्धी चंदे, ऐश्वर्या देवी, राखी गांधी, जयश्री तनपुरे, भारती दौलतनी, साक्षी मेहतानी, ऋतुजा गिते, दीपशिका कराचीवाला, शिल्पा बालवे, सपना गुगळे, दीपिका भारदे आदी आरोग्यवर्धिनीच्या सर्व विद्यार्थिनी परिश्रम घेत आहेत.

## महिलांचे शिक्षण आणि कर्तृत्व समाजाला नवी दिशा देणारे – मनोज क्षीरसागर

### सीए परीक्षेत यशस्वी कु गीतांजली गुरसाळेचा सन्मान । पवन नागरिक सहकारी पतसंस्थेत महिला दिन उत्साहात साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पवन नागरिक सहकारी पतसंस्थेच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षेत यश संपादन करणाऱ्या कुमारी गीतांजली गुरसाळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर पतसंस्थेतील महिला कर्मचाऱ्यांचाही महिला दिनानिमित्त सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या प्रसंगी पतसंस्थेचे चेअरमन बाळासाहेब हुच्चे, व्हा चेअरमन मनोज क्षीरसागर, किरण धारक, दत्तात्रय डोळसे, निशिकांत शिंदे, प्रसाद शिंदे, संजय धोकरीया , सौ. अर्चना काळे, सौ. आशा चौरे, श्री. अभय काळे, दीपक भागवत, ॲड. विनायक दारुणकर, ॲड. संदीप पाटोळे, सौ. मधुराज जोशी, सागर सातपुते, नंदकुमार गुरसाळे, सौ. कविता डोळसे, मृणाली तिवारी आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गीतांजली गुरसाळे यांना शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

यावेळी व्हा चेअरमन मनोज क्षीरसागर म्हणाले की, आजच्या काळात महिलांनी शिक्षण, उद्योग, प्रशासन आणि वित्तीय क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. कठोर परिश्रम, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर महिलांनी अनेक क्षेत्रांत उल्लेखनीय यश मिळवले आहे. सीएसारख्या कठीण परीक्षेत यश मिळवणारी गीतांजली गुरसाळे तरुणींकरिता प्रेरणादायी उदाहरण आहे. अशा यशस्वी महिलांचा सन्मान करणे म्हणजे समाजातील मुलींना मोठे स्वप्न पाहण्याची प्रेरणा देणे होय.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, महिला सक्षम झाल्या तर कुटुंब, समाज आणि देश यांची प्रगती निश्चित होते. महिलांना शिक्षण आणि संधी मिळाल्यास त्या प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात, हे अनेक उदाहरणांमधून दिसून आले आहे. त्यामुळे समाजाने महिलांना प्रोत्साहन देणे व त्यांचा सन्मान करणे ही काळाची गरज आहे. पवन नागरिक सहकारी पतसंस्था सामाजिक बांधिलकी जपत अशा उपक्रमांद्वारे महिलांच्या कार्याचा गौरव करत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी प्रसाद शिंदे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, महिला दिन हा केवळ एक दिवसापुरता मर्यादित नसून महिलांच्या कर्तृत्वाचा आदर दररोज केला गेला पाहिजे. समाजाच्या प्रगतीमध्ये महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. गीतांजली गुरसाळे यांनी सीए परीक्षेत मिळवलेले यश हे अभिमानास्पद असून त्यांच्यासारख्या तरुणींमुळे इतर मुलींनाही प्रेरणा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निशिकांत शिंदे यांनी केले तर आभार दत्तात्रय डोळसे यांनी मानले तसेच महिला कर्मचारी सौ. कविता डोळसे, मृणाली तिवारी आदींनी मनोगत व्यक्त केले.


# मर्चंट्स को-ऑप बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या चेअरमनपदी सीए आयपी अजय मुथा यांची निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने सहकारी बँकांच्या कामकाजात अधिक पारदर्शकता, व्यावसायिकता आणि सक्षम व्यवस्थापन निर्माण करण्याच्या उद्देशाने बोर्ड ऑफ मॅनेजमेंट (बीओएम) स्थापनेबाबत ३१ डिसेंबर २०१९ तसेच २८ नोव्हेंबर २०२५ रोजी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या सूचनांचा उद्देश बँकांच्या कामकाजात तांत्रिक व व्यावसायिक कौशल्याचा प्रभावी वापर होऊन नियामक अटींचे काटेकोर पालन सुनिश्चित करणे हा आहे. या पार्श्वभूमीवर अहमदनगर मर्चंटस को ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाने सीए आयपी अजय मुथा यांची बोर्ड ऑफ मॅनेजमेंट मध्ये नियुक्ती करून त्यांची चेअरमन म्हणून निवड केली आहे.

बँकेच्या नुकत्याच झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत बँकेचे संस्थापक चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांच्या हस्ते सीए आयपी अजय मुथा यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थापक चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांनी जाहीर केले की, रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार बोर्ड ऑफ मॅनेजमेंटमध्ये कमाल १२ सदस्य


सीए आयपी अजय मुथा


श्री. किशोर मुनोत

नियुक्त करता येतात. सध्या ५ सदस्य कार्यरत असून सदस्यसंख्या १२ पर्यंत वाढविण्यासाठी आवश्यक कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

बँकेचे नूतन बोर्ड ऑफ मॅनेजमेंट चेअरमन सीए. आयपी. अजय मुथा , नूतन सदस्य किशोर मुनोत

तसेच उद्योजक पेमराजजी बोथरा, सीए प्रवीण कटारिया, राजेश झंवर इतर तीन सदस्य आहेत .

या सत्कार प्रसंगी व्हाईस चेअरमन अमित मुथा, संचालक सीए मोहन बरमेचा, किशोर गांधी, किशोर मुनोत, संजय बोरा, विजय कोथिंबिरे, सुभाष भांड, सीईओ सुनील पुराणिक, जॉईंट सीईओ नितीन भंडारी, कर्मचारी संचालक प्रसाद गांधी, जितेंद्र बोरा आदी उपस्थित होते.

सीए आयपी अजय मुथा हे मागील ३० वर्षांपासून. प्रथितयश प्रॅक्टिसिंग चार्टर्ड अकाउंटंट असून ते इनसॉल्व्हन्सी प्रोफेशनल म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांनी यापूर्वी मर्चंटस बँकेचे चेअरमन तसेच अहमदनगर सीए असोसिएशनचे चेअरमन म्हणूनही अतिशय चांगले योगदान दिले आहे. सामाजिक क्षेत्रातही ते अनेक सामाजिक संस्थांशी संलग्नित असून जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या व्यवस्थापनात त्यांचे स्थापनेपासून सक्रिय योगदान आहे.

संचालक किशोर हस्तीमलजी मुनोत यांचीही बोर्ड ऑफ मॅनेजमेंटमध्ये नियुक्ती करण्यात आली आहे. ते पांजरापोळ गोरक्षण संस्था, राष्ट्रभाषा शिक्षण मंडळ, जिल्हा खादी ग्रामोद्योग या संस्थांवर सचिव म्हणून कार्यरत आहेत. तसेच के.जी. कॉलेजवर ते ट्रस्टी आहेत. त्यांनी बँकेच्या एनपीए रिकव्हरी व लिगल विभागात महत्वपूर्ण व यशस्वी योगदान दिले आहे. या दोघा अनुभवींच्या निवडीचे मर्चंटस बँकेचे सर्व संचालक मंडळ, सभासद, खातेदार, ठेवीदार, हितचिंतक यांनी स्वागत करून अभिनंदन केले आहे.

# महिलांना कायद्याचे ज्ञान आवश्यक - डॉ. उज्ज्वला मुसळे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अ. नगर (स्वायत्त) येथे जागतिक महिला दिन विद्यार्थिनी वसतिगृह दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) उज्ज्वला मुसळे (दिवाणी न्यायालय, अहिल्यानगर) होत्या. समाजात वावरताना महिलांना कायद्याचे ज्ञान असणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना डॉ. उज्ज्वला मुसळे यांनी सामाजिक मर्यादांचे भान ठेवून वागल्यास अनेक अडचणी टाळता येतात, असे सांगितले. व्यक्तिमत्व विकास करताना आरोग्याचीही विशेष काळजी घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अ. जि. मराठा विद्या प्रसारक समाजाच्या खजिनदार मा. ॲड. दीपलक्ष्मी म्हसे या होत्या. अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थिनींना आयुष्यात मिळालेल्या संधीचे सोन करण्याचा संदेश दिला. आई-वडिलांना कधीही दुखवू नका, त्यांचा अभिमान वाढेल असे वर्तन ठेवा आणि शिक्षण पूर्ण करून स्वावलंबी बना, असा उपदेशही त्यांनी केला.

या कार्यक्रमासाठी अ. जि. म. विद्या प्रसारक समाजाचे अध्यक्ष मा. श्री. रा.



ह. दरे साहेब आवर्जून उपस्थित होते. संस्थेच्या विश्वस्त सौ. अरुणाताई काळे तसेच संस्थेच्या सदस्या कल्पनाताई वायकर, अलकाताई जंगले आणि निर्मलाताई काटे यांनीही विद्यार्थिनींना मोलाचे मार्गदर्शन केले. स्त्रीत्वाचा सन्मान हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता तो वर्षातील ३६५ दिवस कायम राहायला हवा, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी महाविद्यालयाच्या विकासाचा आढावा घेत विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या. यावेळी हिराबाई भापकर यांच्या मौलिक कार्यांच्या स्मृतींनाही त्यांनी उजाळा दिला.

महिला दिनाचे औचित्य साधून मुलींच्या वसतिगृहात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. पुस्तक परीक्षण, पत्रलेखन, वक्तृत्व स्पर्धा, स्केच मेकिंग, ब्युटी विथ ब्रेन, मेंदी, संगीत खुर्ची आणि अंताक्षरी अशा स्पर्धांमध्ये विद्यार्थिनींनी उत्साहाने सहभाग घेतला. तसेच विद्यार्थिनींनी सांस्कृतिक कार्यक्रमही सादर केले. जात्यावरच्या ओव्या, भारूड, लावणी, लोकगीत, नाटिका आणि एकांकिका यांसारख्या दर्जेदार सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली. विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थिनींना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सुनिता मोटे यांनी केले. प्रा. डॉ. सुषमा ताकटे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर प्रा. देवकी ढोकणे यांनी विद्यार्थिनींनी आईला लिहिलेल्या पत्राचे वाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सारिका देशमुख आणि प्रा. भाग्यश्री तोडकरी यांनी केले, तर प्रा. संगीता निंबाळकर यांनी आभार मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापिका व वसतिगृहातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## चांगले ,सकस, संस्कारक्षम विचारांची पेरणी करावी. म्हणजे पुढील पिढी कार्यक्षम, गुणवान निघते – रवींद्र करंदीकर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** परिवर्तन प्रतिष्ठान पालवी शिशूविहार सावेडी येथे आजी-आजोबा व नातवंडे यांचा मेळावा घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री रवींद्र करंदीकर होते. सभास्थानी सचिव श्री. अनिकेत घोटणकर, संचालिका सौ. मुग्धा घोटणकर, सौ. अश्विनी भालेराव,शिक्षिका सौ. स्वाती खिस्ती, सौ. रागिणी सूर्यपूजारी, सौ. मानसी देशपांडे, सौ. प्रणाली पाठक हे मान्यवर उपस्थित होते.

आजी आजोबा पालक मेळाव्याला उद्देशून बोलताना रवींद्र करंदीकर म्हणाले आपण आपल्या नातवंडांना जोपासताना सकस, चांगले, संस्कारक्षम विचारांची जडणघडण केल्यास, भावी पिढी कार्यक्षम, गुणवान होईल. त्यांच्या जडणघडणी तून राष्ट्राची उभारणी भक्कम होईल. हल्ली मुलांना, नातवंडांना, देण्यासाठी पालकांकडे वेळ नसतो. ही दु:खातिंका आहे. मुलांच्या शंकांना,प्रश्नांना सखोल, अभ्यास पूर्ण, उत्तरे देणे, हे आजी आजोबा व पालकांचे काम होय.''

पालवी संस्थेची जडणघडण, वाटचाल, गुणात्मक शिकवण्याची हातोटी, वर्षभर घेतलेले उपक्रम, या साऱ्या गोष्टींचा आढावा मुख्याध्यापिका मुग्धा घोटणकर यांनी घेतला. आजी आजोबा मेळाव्यामध्ये प्रसिद्ध कथाकार श्री बाळासाहेब देशमुख यांचे कथाकथन संपन्न झाले. याप्रसंगी त्यांनी अबोली ही आजी-आजोबा आणि नातवंडे यांच्या संवादावर आधारित गोष्ट सादर केली. लहान मुले अतिशय चौकस, चिकित्सक, गुणग्रही, असतात. आजोबा आपल्या नातीने विचारलेला कोड्यांची, प्रश्नांची, उत्तरे तिच्या बालमनाला शोभतील, पचतील अशा अंगाने देतात. देहबोली, शब्द फेक, अभिनय हे त्यांच्या प्रयोगाचे वैशिष्ट्य होते. सर्व विद्यार्थी, आजी आजोबा, देशमुख यांच्या कथेत मंत्रमुग्ध होऊन गेली. उपस्थितांमध्ये प्राचार्य भास्करराव गागरे, नटवर्य पि.डी. कुलकर्णी काका , सर्व आजी-आजोबा, पालक इत्यादी हजर होते. सूत्रसंचालन सौ.मानसी देशपांडे व आभार प्रदर्शन सौ प्रणाली पाठक यांनी केले.

# दिव्यांगांनी पोर्टलच्या माध्यमातून विविध योजना व सेवांचा लाभ घ्यावा – देविदास कोकाटे

## दिव्यांग उमेदवारांसाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दिव्यांगांसाठी शासनाने स्वतंत्र ऑनलाईन पोर्टल उपलब्ध करून दिले आहे. या पोर्टलच्या माध्यमातून विविध योजना व सेवांचा लाभ घेता येणार असून, अधिकाधिक दिव्यांग उमेदवारांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी देविदास कोकाटे यांनी केले.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, युथ फॉर जॉब, जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालय, ज्योत्स्ना उद्योग केंद्र सोसायटी कार्यशाळा व मतिमंद मुलांची शाळा आणि दिव्यांगांसाठीचे नॅशनल करिअर सर्व्हिस सेंटर, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग उमेदवारांसाठीचा रोजगार मेळावा नुकताच संपन्न झाला. यावेळी मार्गदर्शन करताना कोकाटे बोलत होते. मेळाव्यास जिल्ह्यातील ८ नामांकित कंपन्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहून प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे ५९ उमेदवारांची निवड केली. यावेळी कौशल्य विकास व उद्योजकता केंद्राचे सहाय्यक आयुक्त रविकुमार पंतम, डॉ. विद्या जोशी, नितीन जंगम आदींची प्रमुख उपस्थिती होती.

अहमदनगर अपंग कल्याणकारी मंडळाच्या जानकीबाई आपटे मूक बधिर विद्यालयाच्या अध्यक्ष डॉ. विद्या जोशी यांनी दिव्यांग उमेदवारांना रोजगारक्षम व कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व सांगून, सकारात्मक दृष्टिकोनातून कार्य केल्यास वैयक्तिक तसेच देशाच्या



विकासात योगदान देता येत असल्याचे स्पष्ट केले.

नॅशनल करिअर सर्व्हिस सेंटर, मुंबईचे सहाय्यक निर्देशक नितीन जंगम यांनी सांगितले की, दिव्यांग व्यक्तींच्या शारीरिक क्षमतेनुसार योग्य प्रशिक्षण व रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी केंद्रामार्फत विविध उपक्रम राबविले जात आहेत. संगणक संचालन, टेलरिंग, इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल रिपेअरिंग, ऑफिस मॅनेजमेंट यांसारख्या विविध ट्रेडमध्ये मोफत प्रशिक्षण दिले जाते. तसेच पात्र उमेदवारांना प्रशिक्षण कालावधीत दरमहा २ हजार ५०० रुपये विद्यावेतन दिले जाते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात सहाय्यक आयुक्त (कौशल्य विकास) रविकुमार पंतम यांनी श्रमाला प्रतिष्ठा मिळणे आवश्यक असल्याचे सांगून दिव्यांग युवकांनी रोजगार व स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आपल्या जीवनाला योग्य दिशा देण्याची गरज व्यक्त केली व कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. याप्रसंगी जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय आरोटे, मतिमंद शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पुष्पा बनकर, ज्योत्स्ना कार्यशाळेचे भाऊसाहेब बदम उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विक्रम उंडे यांनी केले. आभार ज्योती जाधव यांनी मानले.

या रोजगार मेळाव्यात १२ आस्थापनांनी एकूण १८८ रिक्त पदे अधिसूचित केली होती. मेळाव्यास उपस्थित १५५ उमेदवारांपैकी १२४ नोकरी इच्छुक उमेदवारांनी प्रत्यक्ष मुलाखती दिल्या. या प्रक्रियेत ७८ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली असून, त्यापैकी ५९ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली. तसेच शासनाच्या विविध रोजगार व स्वयंरोजगार योजनांची माहिती आणि रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षणाच्या संधी एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या.

# बुरान कुरैशी– फैज्जान कुरैशी भावंडांनी केला पहिला रोजा पूर्ण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पाचोड ता.पैठण येथील मोहम्मद बुरान कुरैशी वय (७) व फैज्जान कुरैशी वय (९) यांनी पवित्र रमझान महिन्यातील आपला पहिला रोजा यशस्वीरित्या पूर्ण करत एक आध्यात्मिक टप्पा गाठला. अल्लाहवरील श्रद्धा, संयम आणि समर्पण यांचे सुंदर दर्शन घडवणारा हा क्षण कुटुंबासाठी अभिमानाचा ठरला. त्यांच्या या पहिल्या रोजाच्या निमित्ताने पारंपरिक पद्धतीनेरोजे खुलाईचा आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

या मंगल प्रसंगी कुटुंबातील सर्व भाऊबंध, आप्तेष्ट आणि नातेवाईक उपस्थित राहून बुरान कुरैशी व फैज्जान कुरैशी या दैन्ही भावंडावर शुभेच्छांचा वर्षाव केला. सर्वांनी त्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आणि निरोगी, यशस्वी आयुष्यासाठी मनःपूर्वक दुआ केली. अल्लाह तआला अ सदैव सद्बुद्धी, उत्तम आरोग्य आणि जीवनात भरभराट देवो, हीच सर्वांनी प्रार्थना केली.




दोन्ही चिमुकल्यांचे वडील शाहरुख कुरैशी अजोबा महमद कुरैशी,चुलते जाकीर कुरैशी, शाकेर कुरैशी आजोबा पत्रकार अनिषा कुरैशी मामा सोहेल कुरैशी साहील कुरैशी व आरबाज कुरैशी आदीनी अभिनंदन केले.

## तीन दिवसांच्या विश्रांतीनंतर गोदावरी पात्रातून पुन्हा वाळू उपसा सुरू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तीन दिवसांच्या विश्रांतीनंतर गोदावरी नदीपात्रातून पुन्हा मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू झाल्याची माहिती समोर येत आहे. वडवाळी कट, आयटीआय परिसर, पाटेगाव, दादेगाव तसेच झिरो पॉईंट या ठिकाणी रात्री-दिवस यंत्रांच्या साहाय्याने वाळू काढली जात असल्याचे स्थानिकांकडून सांगितले जात आहे.

या ठिकाणी मोठ्या प्रमाणात ट्रॅक्टर व हायवा वाहनांद्वारे वाळूची वाहतूक होत असून, या कामातून काही व्यक्तींमार्फत महसूल गोळा केला जात असल्याची चर्चा देखील परिसरात रंगली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या ठिकाणी काही जणांकडून रोजच्या व्यवहारातून मोठ्या प्रमाणात



पैसे वसूल केले जात असल्याचेही सांगितले जात आहे.

दरम्यान, गोदावरी पात्रातील या वाळू उपशामुळे शासनाच्या महसुलाला फटका बसत असल्याचीही चर्चा आहे. मात्र या प्रकाराकडे संबंधित महसूल विभाग व प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या प्रकरणाची चौकशी करून बेकायदेशीर वाळू उपशावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# मित्राच्या मारहाणीत एकाचा मृत्यू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील पैठण खेडायेथे दारूच्या नशेत झालेल्या वादातून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी सायंकाळी सुमारे ६.३० वाजण्याच्या सुमारास घडली. ही घटना बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, पैठण खेडा येथील रामनाथ नामदेव भादे व त्याच गावातील विष्णु बाबुराव घुंगार्डे यांनी एकत्र दारू प्राशन केले होते. त्यानंतर दारूच्या नशेत दोघांमध्ये वाद झाला. या दरम्यान झालेल्या मारहाणीत रामनाथ भादे यांचे डोके आपटल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली.

जखमी अवस्थेत त्यांना उपचारासाठी हलविण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून पुढील तपास बिडकीन पोलीस करत आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

(पान १ वरून)

## रमजान चिंचोलीतील शेतकऱ्याच्या खुनाचा एलसीबीने केला उलगडा

असता तो त्याचा मित्र सचिन सारवान (रा. खळवाडी, शेगाव) याच्या घरात असल्याची माहिती समजली. पथकाने शेगाव येथे जाऊन सुनील राठोडला ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता तो पोलिसांची नजर चुकवून पळून जाण्याच्या प्रयत्नात पहिल्या मजल्यावरून उडी मारल्याने जखमी झाला.

मयत बापू आनंदा गाढवे यांचा खून झाल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपीविरुध्द एलसीहबीचे पोलीस उपनिरीक्षक दीपक पांडुरंग मेढे यांच्या फिर्यादीवरुन मिरजगांव पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहिता २०२३ चे कलम १०३(१), २३८, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक. सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच तपास पथकातील उपनिरीक्षक दीपक मेढे, पोलीस अंमलदार फुरकान शेख, दीपक घाटकर, भीमराज खर्से, राहुल डोके, शामसुंदर जाधव, सुनील मालणकर, प्रशांत राठोड, सतीश भवर, महिला पोलीस अंमलदार किरण ठुबे, सुवर्णा गोडसे, चालक भगवान दुर्योधन धुळे यांच्या पथकाने केली.

## टाकळी ढोकेश्वर येथे स्वतंत्र पोलीस ठाण्याला अंतिम मंजुरी

पिंप्री जलसेन, शिरापुर, सांगवीसूर्या, चोंभुत, जवळा, रेनवडी, गुणोरे, पाडळी आळे, गाडीलगाव, कळस, राळेगण थेरपाळ, आळकुटी, हाकीगतपूर, माजमपूर, म्हस्के वाडी, कोहकडी, शेरीकासारे, मोरवाडी, पाबळ, म्हसे खुर्द, गारखिंडी, दवाणवाडी, वडझिरे, पठारवाडी, लोणी मावळा, चिंचोली, देवीभोवरे, दरोडी, वडगाव गुंड, पाडळी दर्या, शिरसुले, बाभुळवाडे, वडनेर बु., जाधववाडी, भाळवणी, रांधे, गोरेगाव, डिस्कळ, पाडळी तर्फे कान्हुर, कुरुंद, करंदी या ६६ गावांतील नागरिकांनाही पोलीस सेवांचा लाभ अधिक सुलभपणे मिळणार आहे.

यामुळे पारनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एकूण १०१ गावांतील नागरिकांना कायदा-सुव्यवस्था आणि तक्रार निवारणाच्या दृष्टीने मोठा दिलासा मिळणार असून तालुक्यात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## सर्वसामान्यांना उपचारासाठी मोठा आधार - महापौर ज्योतीताई गाडे

या कार्यक्रमास महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर, उपसभापती वर्षा सानप, माजी सभापती पुष्पाताई बोरुडे, नगरसेविका रोशनी त्रिंबके, सुप्रिया जाधव, शेखर देशपांडे तसेच रोहन सानप आदी उपस्थित होते.

यावेळी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपालीताई बारस्कर म्हणाल्या की, महापालिकेच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेला महापौर दुर्धर वैद्यकीय सहायता निधी हा सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त उपक्रम आहे. आर्थिक अडचणीमुळे उपचार घेणे शक्य नसलेल्या अनेक कुटुंबांना या निधीमुळे मोठा दिलासा मिळत आहे. त्यामुळे शहरातील गरजू नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

## उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी महानगरपालिकेच्या जुन्या मनपा कार्यालयातील विविध विभागाची केली पाहणी

होणे गरजेचे असून येथील तैलचित्रे व ऐतिहासिक वारसा पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. उपमहापौरांच्या या भेटीमुळे जुने मनपा कार्यालय आणि सभागृहाच्या जतनाबाबत सकारात्मक पावले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.